**जिल्हा खनिकर्म अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, हिंगोली यांनी प्रस्तावित केलेल्या हिंगोली जिल्हयातील औंढा नागनाथ, कळमनुरी, वसमत, सेनगाव व हिंगोली तालुक्यातील एकूण ३८ वाळूघाटाच्या संदर्भात दिनांक १९/०८/२०२५ रोजी सकाळी ११:०० वा. जिल्हा नियोजन बैठक सभागृह, जिल्हाधिकारी कार्यालय, हिंगोली येथे घेण्यात आलेल्या पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणीचे इतिवृत्तांत :**

........................................................................................................................

जिल्हा खनिकर्म अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, हिंगोली, यांनी प्रस्तावित केलेल्या हिंगोली जिल्हयातील औंढा नागनाथ, कळमनुरी, वसमत, सेनगाव व हिंगोली तालुक्यातील एकूण ३८ वाळूघाटाच्या संदर्भात दिनांक १९/०८/२०२५ रोजी सकाळी ११:०० वा. जिल्हा नियोजन बैठक सभागृह, जिल्हाधिकारी कार्यालय, हिंगोली येथे पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणी घेण्यात आली होती.

मा. सदस्य सचिव, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई यांच्या कार्यालयीन आदेश क्रं. ई-५२/२०२५ पत्र क्रं. बी.ओ. / जे.डी.(डब्ल्यूपीसी)/पीएच/बी- २५०७२२- एफटीएस-००९१ दि. २२/०७/२०२५ अन्वये, पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणी समिती गठीत करण्यात येऊन खालीलप्रमाणे समितीचे सदस्य सदर लोकसुनावणीस उपस्थित होते.

१. **श्री. राहुल गुप्ता,** (भा.प्र.से) : अध्यक्ष
जिल्हादंडाधिकारी, हिंगोली.

२. **श्री. सो. म. कुरमुडे,** : समन्वयक
उप-प्रादेशिक अधिकारी,
मप्रनि मंडळ, परभणी.

श्री. सो. म. कुरमुडे, समन्वयक पर्यावरण विषयक जाहीर लोक सुनावणी समिती तथा उप प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ, परभणी यांनी उपस्थितांचे स्वागत करुन पर्यावरण विषयक जाहीर लोक सुनावणी समितीचे अध्यक्ष यांच्या परवानगीने सदर जाहीर लोकसुनावणीची कार्यवाही सुरु केली. त्यांनी सांगितले की, जिल्हा खनिकर्म अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, हिंगोली यांनी प्रस्तावित केलेल्या हिंगोली जिल्हयातील औंढा नागनाथ, कळमनुरी, वसमत, सेनगाव व हिंगोली तालुक्यातील एकूण ३८ वाळूघाटाबाबत पर्यावरणविषयक जाहीर लोकसुनावणी घेण्यासाठी आपण येथे जमलो आहोत. सदर प्रकल्प हा पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, भारत सरकारचे अधिनियम दिनांक १४ सप्टेंबर, २००६ च्या अधिसूचनेनुसार 'ब' वर्गात मोडतो. ज्यास महाराष्ट्र शासनाची पर्यावरण विषयक मंजुरी घ्यावी लागते, त्याचाच एक भाग म्हणून सदर प्रकल्पासाठी जाहीर लोक सूनावणी घेणे आवश्यक आहे. तसेच जिल्हा खनिकर्म अधिकारी, हिंगोली यांचा हिंगोली जिल्हयातील वाळू घाटाबाबत पर्यावरण

विषयक जाहीर लोक सुनावणी घेण्यासाठी रितसर अर्ज महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडे दि. ०४/०७/२०२५ रोजी प्राप्त झाला होता. त्याअनूषंगाने मा. जिल्हाधिकारी, हिंगोली यांच्या परवानगीने आजची लोकसूनावणी जिल्हा नियोजन बैठक सभागृह, जिल्हाधिकारी कार्यालय, हिंगोली येथे दि. १९/०८/२०२५ वेळ- स. ११.०० वा. निश्चित करण्यात आली. सदर पर्यावरण विषयक जाहीर लोकसूनावणी बाबत नियमानूसार ३० दिवस अगोदर दि. १०/०७/२०२५ रोजी दैनिक सकाळ (मराठी) व दैनिक टाईम्स ऑफ इंडिया (इंग्रजी) या वृत्तपत्रामध्ये जाहीर सूचना प्रसिध्द करण्यात आली. तसेच जिल्हयातील संबंधित शासकीय कार्यालये व महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या संकेतस्थळावर सदरच्या प्रकल्पाची माहिती पुस्तिका नागरिकांच्या अभ्यास व अवलोकनाकरीता ठेवण्यात आलेल्या होत्या, त्याची यादी खालीलप्रमाणे-

१. जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, हिंगोली.
२. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद कार्यालय, हिंगोली.
३. व्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र, हिंगोली.
४.तहसिलदार, तहसिल कार्यालय-औंढा नागनाथ.
५.तहसिलदार, तहसिल कार्यालय-कळमनुरी.
६. तहसिलदार, तहसिल कार्यालय-वसमत.
७.तहसिलदार, तहसिल कार्यालय-सेनगाव.
८.तहसिलदार, तहसिल कार्यालय- हिंगोली.
९. **मुख्याधिकारी, नगरपरिषद, हिंगोली.**
१०. ग्रामपंचायत कार्यालय, टाकळगव्हाण, आजरसोंडा, तपोवन, भगवा, पोटा खुर्द, नालेगाव, अंजनवाडी, ता. औंढा नागनाथ.
११. ग्रामपंचायत कार्यालय, नांदापुर, सोडेगाव, डिग्रस त. कोंढुर, कस्बेधावंडा, सापळी, पिंप्री बु., कान्हेगाव, चिखली, ता. कळमनुरी.
१२. ग्रामपंचायत कार्यालय, सोन्ना त हटटा, पिंपळगाव कुटे, सावंगी बु., ढवुळगाव, माटेगाव, ता. वसमत.
१३. ग्रामपंचायत कार्यालय, लिंबाळाहुडी, वायचाळ पिंपरी, लिंबाळा आमदरी, भगवती, गुगळपिंपरी, ब्रम्हवाडी, चिखलागर, बन, वझर खु., पिंपरी बरडा ता. सेनगाव.
१४.ग्रामपंचायत कार्यालय, आमला, ईडोळी, हिंगणी, खेड, खरबी, खांबाळा, दुर्गधामणी, ता. हिंगोली.
१५. उप प्रादेशिक कार्यालय, म.प्र.नि.मंडळ, देवकृपा इमारत, रंगनाथ महाराज नगर, नांदखेडा रोड, परभणी.
१६. प्रादेशिक कार्यालय, म.प्र.नि.मंडळ, भूखंड क्रं. ए-४/१, एमआयडीसी चिकलठाणा, छत्रपती संभाजी नगर.
१७. महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुख्यालय, कल्पतरू पॉईन्ट, ३ रा माळा, सायन माटूंगा स्कीम रोड नं.८, सायन सर्कल समोर, सायन (पूर्व), मुंबई-२२.
१८. पर्यावरण विभाग, नवीन प्रशासन भवन, १५ वा मजला, मादाम कामा मार्ग, मंत्रालय, मुंबई-३२.

१९. प्रादेशिक कार्यालय, पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, पश्चिम मध्य विभाग, तळमजला, पूर्व विंग, नविन सचिवालय इमारत, सिव्हील लाईन, नागपूर.

तसेच पूढे त्यांनी नमुद केले की, याबाबत काही सूचना/आक्षेप असल्यास याबाबत कळवण्यासाठी ३० दिवसाची मूदत देण्यात आलेली होती त्या अनुषंगाने उप प्रादेशिक कार्यालय, म.प्र.नि. मंडळ, परभणी येथे ईमेलद्वारे एक निवेदन प्राप्त झालेली आहे. तसेच त्यांनी उपस्थित नागरिकांना विनंती केली की, अजूनही आपले काही आक्षेप/टिका/टिप्पणी असतील तर ते आपण प्रकल्पाचे सादरीकरण झाल्यानंतर विचारावेत. तदनंतर त्यांनी, सदर प्रकल्प प्रवर्तकांना प्रस्तावित प्रकल्पाविषयीचे सादरीकरण करण्याविषयी विनंती केली.

त्यास अनुसरुन प्रकल्पाचे पर्यावरणीय सल्लागार श्री. तन्मय दहातोंडे, मे. एन्व्हायरो टेक्नो कंसल्ट प्रायव्हेट लिमिटेड, नागपूर यांनी प्रकल्पाबददल तालूकानिहाय विविध मुदयांवर सादरीकरण केले जसे की, प्रकल्पाचा तपशील, पर्यावरणीय प्रदूषण, योजना साधने, करण्यात येणा-या उपाय योजना इं. समावेश होता.

त्यांनी पूढे सांगितले की, सदर वाळूघाटावर वाळू उपसा करण्यासाठी कुदळ, फावडे, घमेले यासारख्या हातांच्या साधनांचा उपयोग केला जाईल. केवळ कोरडया नदीच्या पात्रातून वाळू उत्खनन केले जाईल. कूठल्याही मशिनरीचा वापर केला जाणार नाही. वायू प्रदूषण नियंत्रणासाठी वाळू वाहतुकीसाठी वापरल्या जाणा-या कच्च्या रोडवर नियमित पाणी शिंपडले जाईल. फक्त टॅक्टर ट्रॉली द्वारे नदीपात्रातून वाळूची वाहतूक ताडपत्रीने झाकुन करण्यात येईल. ध्वनी प्रदूषण नियंत्रणासाठी खाणकाम आणि वाळू वाहतुक केवळ दिवसाच्या वेळीच केली जाईल. जल प्रदूषण नियंत्रणासाठी वाळू उत्खनन केवळ कोरडया नदीच्या बेडवरच केले जाईल. खाण खडयाची खोली नदीच्या पाण्याच्या पातळीवरच ठेवली जाईल. निष्क्रीय वाहिन्या तयार करण्यासाठी नदीचे प्रवाह वळविले जाणार नाहीत, नदीत वाहने धुण्यास मनाई करण्यात येईल, खाणकामातून कोणतेही सांडपाणी तयार होणार नाही याची काळजी घेण्यात येईल. कामगारांना मोबाईल टॉयलेटची सोय करण्यात येईल, पावसाळयात आणि पूरात उत्खनन टाळले जाईल यामुळे वाळू उपसा पुन्हा भरु शकेल. जमीनीचे पर्यावरण समतोल राखण्यासाठी खाणकाम परवानगी घेतल्याच्या क्षमतेपेक्षा जास्त होणार नाही, नदीकाठ आणि जवळपास मोकळया जागांवर वृक्षारोपन विकसित केले जाईल. खाणीमध्ये काम करणा-यांना वैयक्तिक संरक्षणात्मक उपकरणे दिली जातील. खाण साईटवर प्रथमोपचार किट प्रदान केले जाईल. पर्यावरणाची हानी होणार नाही याची दक्षता घेण्यात येईल.

तालुक्यातील वाळुघाटाची माहिती खालील प्रमाणे आहे.

**तालुका औंढा नागनाथ -**

| अ. क्रं. | वाळूघाटाचे नांव | गट क्रं. | क्षेत्रफळ लांबीxरूंदीxखोली | क्षेत्र हेक्टर | उपलब्ध वाळू साठा (ब्रास) |
|---|---|---|---|---|---|
| १ | टाकळगव्हाण | १,१२,१३,१४,१५,१६,२१,२२,२४,५२,२६,२७,२९,३,०३१,१६३,१६४,१६५,१६६,१६७,१६८,१६९,१७०,१८९,१९१ | ३५०x३०x०.५ | १.०५ | १८५५ |
| २ | आजरसोंडा | ४०३,४०५,४१६,४१७,४२६,४२७,४३०,४३५,४३७,४६६,४६७,४७४,४७५,४७६,४०४ | ३५०x३०x०.५ | १.०५ | १८५५ |
| ३ | तपोवन | १३,२१,२५,२६,२७,२८,२९,३०,३१,२८४,२८७,२८८,२८९,२९० | ४००x२५x०.५ | १.०० | १७६७ |
| ४ | भगवा | ५३,५४,५५,५६,०६,०७ | ४००x२५x०.५ | १.०० | १७६७ |
| ५ | पोटाखुर्द | २०,२१,३७,३८,३९,४०,४६,४७,२७२,२७३,२७४,२७५,२७७,२७८,२७९,२८०,२८१,२८२,२८३,२८४,२८५,२८६,२८ | ३००x४०x०.५ | १.२० | २१२० |
| ६ | नालेगाव | १८,२,२५५,२५३,२५२,२४०,२३३,२३२,२३१ | ३००x४०x०.५ | १.२० | २१२० |
| ७ | अंजनवाडी | २०७,२०८,२०९,२१०,२११,२१२,२१३,२१४,२१५,२१६,२१७,२१८ | ४००x३०x०.५ | १.२० | २१२० |

**तालुका कळमनुरी -**

| अ. क्रं. | वाळूघाटाचे नांव | गट क्रं. | क्षेत्रफळ लांबीxरूंदीxखोली | क्षेत्र हेक्टर | उपलब्ध वाळू साठा (ब्रास) |
|---|---|---|---|---|---|
| १ | नांदापुर | ४१२,४१४,४१५,४१७,४१८,४१९,४२०,४२१,४२२ | ४६०x२५x०.५ | १.१५ | २०३२ |
| २ | सोडेगाव | ३५२,३९१,३८४,३८३,३७८,३७७,३७३,३७२,३७१ | ५००x२५x०.५ | १.२५ | २२०८ |
| ३ | डिग्रस त. कोंढुर | ८/२,९/१,३४,३५,३७/१,३८,३९,४०,४१,४२ | ४५०x२५x०.३ | १.१३ | ११९३ |
| ४ | कोंढुर | १४१,१४२,१४३,१४४,१४५,१४६,१४७,१९५,१९६,१९७ | ४५०x२५x०.३ | १.१३ | ११९३ |
| ५ | कस्बेधावंडा | ४८,४३,४२,४१,४०,३९,२,५६,५७,५८,५९,६१,६२,६४,६५,६६,६७ | ४९०x२५x०.५ | १.२३ | २१६४ |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ६ | सापळी | ४,५,६,७,३१,३२,३३,३४,३५,३६,३७,३८,५८,६१,६२,६३ | ४५०x२५x०.५ | १.१३ | १९८८ |
| ७ | पिंप्री बु. | ९,१०,६,३,२,१,१९३,१९४,१९५,१९६,१९९ | ४५०x२८x०.२ | १.२६ | ८९० |
| ८ | कान्हेगाव | ६,२५,२६,२७,३१ | ५००x२०x०.८ | १.०० | २८२७ |
| ९ | चिखली | ३,२,१,३१,३२,३४ | ५३०x२१x०. ५ | १.११ | १९६६ |

**तालुका वसमत -**

| अ. क्रं. | वाळूघाटाचे नांव | गट क्रं. | क्षेत्रफळ लांबीxरूंदीxखोली | क्षेत्र हेक्टर | उपलब्ध वाळू साठा (ब्रास) |
|---|---|---|---|---|---|
| १ | सोन्ना त हट्टा | १५६,१५२,१५१,१५०,१४२,१४१ | ४३०x३०x०.८ | १.२९ | ३६४७ |
| २ | पिंपळगाव कुटे | ३५६,३५७,३५८,३५५,३४७,३४६,३४१,३५९,३४० | ५००x२०x०.५ | १.०० | १७६७ |
| ३ | सावंगी बु | १,३,३६७,३६८,३६० | २५०x४०x०.६ | १.०० | २१२० |
| ४ | ढवुळगाव | १५,१४,१३,९,८,४,३,२,२१२,२११,२०९,२०७,२०८ | ५००x२०x०.५ | १.०० | १७६७ |
| ५ | माटेगाव | २,३,४,२२०,२२२ | ५००x२०x०.५ | १.०० | १७६७ |

**तालुका सेनगाव -**

| अ. क्रं. | वाळूघाटाचे नांव | गट क्रं. | क्षेत्रफळ लांबीxरूंदीxखोली | क्षेत्र हेक्टर | उपलब्ध वाळू साठा (ब्रास) |
|---|---|---|---|---|---|
| १ | लिंबाळा हुडी | ६,७,८ | ४०० x२५x ०.५ | १.०० | १७६७ |
| २ | वायचाळ पिंपरी | १०१,१०२,४३०,४३१,४३२,४९२,५१७,५१८,५२०,५२१,५२६,५२७,५२८,५२९,५३०,५३१,५३२,१४,१५,१६,१७,१८,५५,५६,५७,५८ | ५००x२०x०.२० | १.०० | ७०७ |
| ३ | लिंबाळा आमदरी | ३,३६,३५,३४,२८,२७ | ३५०x३०x०.५ | १.०५ | १८५५ |
| ४ | भगवती | ५६२,५६८,५७९,५७६,७००,७०३,७०८,७२४,७२५,७२६ | ५००x२०x०.२० | १.०० | ७०७ |
| ५ | गुगळपिंपरी | १३८,१३९,१४३,१४४,१४५,१५०,१५२,१५३,१५४ | ५००x२०x०.२० | १.०० | ७०७ |
| ६ | चिखलागर | ३१,१५७,१११,१५६ | ३५०x३०x०.५ | १.०५ | १८५५ |
| ७ | ब्रम्हवाडी | १४३,१४०,१३५,१४४,१४२ | ५००x४०x२.०० | २.०० | १४१३४ |
| ८ | बन | ३९३,३७२,३६४,२५३,१४२ | ५००x२०x०.३ | १.०० | १०६० |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ९ | वझर खु. | १७३,१७२,१७१,१६६,१६५,१६२,१६१,१८८,३५१,१५७,१५५,१५३,१२९,१२८,१२७ | ५००x२०x०.५ | १.०० | १७६७ |
| १० | पिंपरी बरडा | ६,५,४,३,२,९९,९८,९७,८९,८८,८७,८०,७९,७८,७७,७६ | ५००x२०x०.३ | १.०० | १०६० |

**तालुका हिंगोली -**

| अ. क्रं. | वाळूघाटाचे नांव | गट क्रं. | क्षेत्रफळ लांबीxरूंदीxखोली | क्षेत्र हेक्टर | उपलब्ध वाळू साठा (ब्रास) |
|---|---|---|---|---|---|
| १ | आमला | २६३ते२६८,२७६ते२७९,२९७,२९८,३१०ते३१५,३२६ते३३१,३३४, ३३६ | ६००x१८x०.२ | १.०८ | ७६३ |
| २ | इडोळी | ४९०ते४९७,४०९,४२३,४२६ते४२९,४४९ते४५८,३७६ते३८० | ६७०x१५x०.२५ | १.०१ | ८८८ |
| ३ | हिंगणी | ३६३,३६४,३६८,३६९,३७०,३५५,३३४,३२६,३११,३१२,३१८,२२२,२९,१९,१७,१५,१४,३१६,३१५,३०४,३०२,३०१,३००,२९९,२७४,२७८,२७१,२६९,२६५,२६४,२६३,२६२,२०२,२५१ | ५००x२०x०.५ | १.०० | १७६७ |
| ४ | खेड | १६७,१६६,१६८,१६९,१६२,१६४,१६१,१६०,१५९,१५८,१५५,१५७,१५४,१५३,१४९,१४८,१४७,१४१,१३४,१३६,९७,८५,७८,७७,७६ | ५००x२०x०.५ | १.०० | १७६७ |
| ५ | खरबी | १४३,१४४,१५५,१६०ते१६८,२३४ते२३९ | ३५०x३०x०.५ | १.०५ | १८५५ |
| ६ | खांबाळा | १३१,१३०,१३४,१३५,१३६,१४२,१४४,१४७ ते१४९,१५४ | ५००x२०x०.५ | १.०० | १७६७ |
| ७ | दुर्गधामणी | २५६,२५७,२२०ते२२५ | ६००x२०x०.२ | १.२० | ८४८ |

सदर माहिती सीडीमध्ये रेकॉर्डींग करण्यात आली असून संक्षिप्तमध्ये इतिवृत्तांतात नोंद करण्यात येत आहे.

प्रस्तावित प्रकल्पा विषयीचे सादरीकरण झाल्यानंतर श्री. सो. म. कुरमुडे, समन्वयक तथा उप प्रादेशिक अधिकारी, मप्रनि मंडळ, परभणी यांनी उपस्थितांना सांगितले की, आपल्या लेखी/तोंडी काही टिका टिप्पणी असतील तर त्या मांडाव्यात जेणेकरुन पर्यावरण विषयक

जनसुनावणीच्या इतिवृत्तात त्याची नोंद घेणे शक्य होईल असे नमुद केले. तसेच प्रथम आपण आपले नांव, गावाचे नाव सांगावे नंतर आपले काय म्हणणे आहे ते या ठिकाणी नोंदवावे अशी विनंती केली.

१. **श्री. छत्रपती दत्तराव गडदे, उपसरपंच, ब्रम्हवाडी, ता. सेनगाव, जि. हिंगोली** यांनी असे सांगितले की, आमच्या ब्रम्हवाडी गावामध्ये नेहमी वाळू उत्खनन करण्यात येते यामुळे शासनाचा महसूलामध्ये वाढ होते हि एक चांगली बाब आहे. या अगोदर ब्रम्हवाडी येथील वाळू उत्खननाचे २०१३ व २०१५ मध्ये टेंडर दिलेले आहे. परंतु, सदर वाळूचे उत्खनन नियमानुसार केले जात नाही. वाळू उपसा रात्री आणि दिवसा देखील केले जाते तसेच दिलेल्या नियोजीत क्षमतेपेक्षा अधिक प्रमाणात उत्खनन करण्यात येते. यामुळे शासनाने सदर वाळू उत्खनन बाबत योग्य त्या उपाययोजना/नियोजन करावे जेणेकरून अवैधरित्या वाळूचे उत्खनन होणार नाही. तसेच वाळू वाहतूकीसाठी गावामध्ये १ कि.मी. एवढा रस्ता आहे यामध्ये शाळा आणि अंगनवाडी या दोन्ही या रत्याजवळच आहे यामध्येदेखील शासनाने उपाययोजना करण्यात याव्यात. तसेच पुढे त्यांनी सांगितले की, सदर वाळू वाहतूकीमूळे गावातील रस्ते खराब झालेले आहेत. खराब रस्ते दुरूस्तीचे काम करण्यासाठी प्रस्तावित वाळू प्रकल्पामार्फत शासनाने २५% रक्कम ग्रामपंचायत कार्यालयाला देण्यात यावी अशी विनंती केली.

**यावर मा. श्री. राहूल गुप्ता, अध्यक्ष तथा जिल्हादंडाधिकारी, हिंगोली** यांनी सांगितले की, वाळू उत्खनन बाबत नियोजन करून त्याबाबत सर्व प्रकारची काळजी घेण्यात येणार आहे.

२. **श्री. रामप्रसाद सोपानराव काळे, ग्रामसेवक, सोन्ना त हट्टा, ता. वसमत, जि. हिंगोली** यांनी सांगितले की, वाळू वाहतूक मार्ग गावाजवळ असलेल्या शाळेजवळूनच केली जातो त्यामूळे शाळेतील विद्यार्थ्यांना याचा त्रास होत असतो. यासाठी वाळू वाहतूक करण्यासाठी वेगळा पर्यायी मार्ग देण्यात यावा अशी येथील ग्रामपंचयात कार्यालयाची मागणी आहे.

**यावर मा. श्री. राहूल गुप्ता, अध्यक्ष तथा जिल्हादंडाधिकारी, हिंगोली** यांनी सांगितले की, वाळू वाहतूक करण्यासाठी पर्यायी मार्ग असेल तर याबाबत कळविण्यात यावे. तसेच आपण दिलेल्या सुचनांची येथे नोंद घेण्यात आलेली आहे.

३. **श्री. प्रसाद खळे, वरिष्ठ संवर्धन अधिकारी, मुंबई** यांनी सदर ३८ वाळूघाटाबाबत काही प्रश्न, टिप्पणी व सुचना दि. १४/०८/२०२५ रोजीच्या इमेलद्वारे सादर केल्या. (प्रत सोबत जोडण्यात येत आहे).

**यावर पर्यावरणीय सल्लागार** यांनी इआय रिपोर्ट बद्दल बोलताना सांगितले की, वाळूघाटाचे क्षेत्रफळ ५ हेक्टर पेक्षा जास्त असल्यास त्यासंबंधी इआयए ड्राफ्ट बनविण्यात येतो व ज्यांचे क्षेत्रफळ ५ हेक्टर पेक्षा कमी असल्यास त्याचा इआए ड्राफट बनविला जात नाही. सदरील घाट हे ५ हेक्टर पेक्षा कमी क्षेत्रफळ बी-२ श्रेणीत मोडतात असल्यामुळे त्याचे इआयए ड्राफ्ट न बनवता इएमपी ड्राफ्ट बनविण्यात आले आहे.

**यावर श्री. सो. म. कुरमुडे, समन्वयक तथा उप प्रादेशिक अधिकारी, मप्रनि मंडळ, परभणी** यांनी सदर वाळू घाटा संदर्भात पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणी जिल्हाधिकारी कार्यालय, हिंगोली येथे का घेण्यात येत आहे या प्रश्नाबाबत सांगितले की, हिंगोली जिल्हयाचे क्षेत्रफळ हे फार कमी आहे. तसेच, सदरील वाळू घाटाचे अंतर हे जिल्हाधिकारी कार्यालयापासुन जास्तीत जास्त ३० ते ३५ कि.मी. व कमीत कमी १० कि.मी. एवढे आहे. या सर्व बाबी लक्षात घेता केंद्रबिंदू म्हणून आपण सदर लोकसुनावणी जिल्हाधिकारी कार्यालय येथे घेत आहोत.

तदनंतर मा. श्री. राहूल गुप्ता, अध्यक्ष तथा जिल्हादंडाधिकारी, हिंगोली, यांनी सर्वप्रथम उपस्थित सहभागींचे आभार मानून थोडक्यात सांगितले की, आपण मांडलेले मुद्दे जसे की वाळू वाहतूकीमूळे रस्ता खराब होणे, आजूबाजूच्या परिसरात धूळ उडणे इ. याबाबतीत जिल्हा वार्षीक योजना व जिल्हा खनिकर्म योजना मार्फत सदर गावामध्ये सर्व्हे करण्यात आलेला असून गावातील रखडलेली विकास कामे व दुरूस्तीचे कामे यांची नोंद शासनातर्फे अगोदरच घेण्यात आलेली आहेत. तसेच नवीन शासनाच्या धोरणानुसार सदर वाळू घाट लिलावाची प्रक्रिया पूर्ण करण्यात येईल. पूढे उपस्थित नागरिकांमधून कोणतेही प्रश्न नसल्यामुळे मा. अध्यक्ष यांनी सदर पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणी संपन्न झाल्याचे जाहीर केले.

**सो. म. कुरमुडे**
(समन्वयक)
तथा
उप प्रादेशिक अधिकारी
म.प्र.नि. मंडळ, परभणी

**राहूल गुप्ता** ( भा.प्र.से )
(अध्यक्ष)
तथा
जिल्हादंडाधिकारी, हिंगोली